# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

### आकुर्ली रोड मनपा प्रसूतीगृह,कांदिवली पुर्व

### जाहिरात क्र. एचओ/1079/एआरएमएच दि.20.02.2026

**विषय:-** आर/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत आकुर्ली रोड मनपा प्रसुतिगृह ,कांदिवली पुर्व येथे कंत्राटी तत्वावर बधिरिकरणतज्ञ पॅनलवर निवड करण्याबाबत.

आर/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत आकुर्ली रोड मनपा प्रसुतिगृह, कांदिवली (पूर्व) येथील आंतररूग्णांच्या शस्त्रक्रीयेकरिता बधिरिकरणतज्ञ यांची पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक **बधिरिकरणतज्ञ** यांची परिपत्रक क्र. एचओ /19816 / आस्था.-2 दि. 13.12.2025 अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार दि 25.02.2026 ते दि.11.03.2026 पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता**

1 उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी / पदविका / डीएनबी धारण करणारा असावा.

2 पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर 1 वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.

3 महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

4 अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मॅडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र / नुतणीकरण आवश्यक.

**बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती**

1 बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची **वयोमर्यादा 65 वर्षापर्यंत राहिल.**

2 प्रत्येक प्रसूतिगृहात बधिरिकणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनेलमध्ये कमीत कमी दोन तज्ञ असावेत.

3 बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्रांकीत पध्दतीने शस्त्रक्रिये करिता बोलाविण्यात यावे.

4 **बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह / रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.**

5 बधिरिकरणतज्ञ नियमित शस्त्रक्रियेबरोबर तातडीच्या शस्त्रक्रियेकरीता सुध्दा उपलब्ध असावेत.

6 एकुण 3 बधिरीकरणतज्ञांची निवड पॅनलवर केली जाईल व अतिरिक्त 1 बधिरीकरणतज्ञ यांची निवड प्रातिक्षायादी करिता केली जाईल.

7 पॅनलवर बधिरिकरण तज्ञांची निवड करण्याचे अंतिम निर्णय हे मान. कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते यांचे राहील.

**<u>बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांना देण्यात येणा-या सुधारित दराचा तपशिल</u>**

| **बधिरिकरण पॅनल मानधनाचा तक्ता** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **सुविधेचे नाव** | **शस्त्रक्रियेचा प्रकार** | **प्रस्तावित मानधन** | **नियोजित वेळेपेक्षा जास्त झालेल्या वेळेसाठी जास्त मानधन** |
| अ. | बधिरिकरण सेवा | **नित्य स्वरूपाच्या** | | |
| | | लहान शस्त्रक्रिया | रू. 1850/- पहिल्या तासाकरिता | रू.300/- प्रति तास |
| | | मोठया शस्त्रक्रिया | रू.4500/-पहिल्या तीन तासाकरिता | रू.700/- प्रति तास |
| ब. | | **तात्काळ स्वरूपाच्या** | | |
| | | लहान शस्त्रक्रिया | रू.3500/- पहिल्या तासाकरिता | रू.550/- प्रति तास |
| | | मोठया शस्त्रक्रिया | रू.6000/- पहिल्या तीन तासाकरिता | रू.1400/- प्रति तास |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक **<u>बधिरिकरणतज्ञ</u>** यांनी वैद्यकीय अधिकारी आकुर्ली रोड मनपा प्रसुतिगृह, कांदिवली (पूर्व) यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व सहकागदपत्रे **वैद्यकीय अधिकारी, आकुर्ली रोड मनपा प्रसूति गृह, दामुपाड/केलीपाडा, ठाकुर कॉलेजच्या मागे,कांदिवली पुर्व,मुंबई-400101** कार्यालयात दि.25.02.2026 ते दि.11.03.2026 पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनक सुट्टी वगळून) सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा. पर्यंत पोचतील याची दक्षता घ्यावी.

सही/-20.02.2026
वैद्यकीय अधिकारी
आकुर्ली रोड मनपा प्रसुतिगृह, कांदिवली (पूर्व)